# दत्त नागरी काल - आज - उद्या

श्री दत्त नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित इस्लामपूर या संस्थेचा रौप्यमहोत्सव सांगता समारंभ १५ जून २०१७ रोजी आगळा वेगळा पण दिमाखात संपन्न झाला. या कार्य क्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून मा. श्री. पी. एन. जोशी साहेब,संचालक सारस्वत सहकारी बॅंक व माजी अध्यक्ष युनायटेड बॅंक आणि डॉ. अ. रा. पडोशी सर गोवा विद्यापीठातील अर्थशास्त्र प्रमुख हे लाभले होते. पी. एन. जोशी साहेबांनी पतसंस्था मॉडेल बनवा, पतसंस्थेतील संचालक कर्मचारी यांनी काय करावे व काय करू नये असे अनेक गोष्टी पतसंस्थेच्या हिताच्या सांगितल्या त्यांचे विचार सर्वच पतसंस्थांनी आचरणात आणावेत असे आहेत. डॉ. पडोशीसरांनी आपल्या हलक्या फुलक्या भाषणात तुमची आर्थिक स्थिती खूप चांगली आहे. अशीच तुमची प्रगती राहिली तर तुम्ही नोबेल पारितोषीक सुध्दा मिळवाल असे सांगितले.

संस्थेच्या स्थापनेची सुरूवातीची अवस्था ही फुलपाखरांच्या अळीसारखी होती. छोटी एक खोली, एक टेबल, दोन खुर्च्या एवढाच प्रपंच. एकाच टेबलावर बसून संस्थापक चेअरमन पी. बी. कुलकर्णी व ऑनररी सेक्रेटरी जी. एस्. कुलकर्णी हे सर्व व्यवहार हाताळणार. शिपाई नव्हता तेव्हा एक बोकील नावाचे संचालक स्वतः सर्व खोली झाडून काढत होते. बाकीच्या संचालकांना बसायला खोलीत जागा नव्हती ते सर्वजण समोरच्या दुकानाच्या पायरीवर बसायचे.

संस्थेची पहिल्या वर्षीची म्हणजे १९९२ - ९३ ची आर्थिक स्थिती अशी होती. अधिकृत भागभांडवल २००००० गंगाजळी व इतर निधी ११६३ वसूल भाग भांडवल १५८४४० ठेवी १३८१०६९ कर्जे ७३५६५४ नफा १५७३ व खेळते भाडवल १५७८११२.

दत्त नागरीच्या उदघाटनाला जेंव्हा बापूसाहेब पूजारी आले होते तेंव्हा जी. एस्. कुलकर्णी त्यांना म्हणाले होते आम्ही १ पै ची मदत बाहेरून घेणार नाही आमच्या स्वबळावर आम्ही संस्था चालवणार आहोत त्याप्रमाणे त्यांनी करून दाखवले.

संस्थेला पहिल्या वर्षीपासून नफा झालेला आहे. पहिल्यापासून संस्था चार्टर्ड अकौंटंट कडून ऑडीट करून घेते आहे. आर्थिक व्यवहार नियमानुसार कसे ठेवायचे याचा सल्ला आमचे **सी. ए डफळापूरकरसाहेब** आम्हाला देत आहेत. अजूनही केंव्हाही आम्ही त्यांचा सल्ला घेत असतो. ३० हजाराची कर्जे देताना दहा वेळा विचार करणारी आमची संस्था आता ४० लाखाची कर्जे सहजपणे देते. सांगली जिल्हा हे आमचे सध्याचे कार्यक्षेत्र आहे. आमच्या अटीमध्ये नियमामध्ये बसणा-या कोणत्याही व्यक्तीला आम्ही कर्जे देतो. सुक्ष्म कर्जे जास्त

प्रमाणात दिली जावीत असे संस्थेचे धोरण आहे. सर्व सामान्य माणसाला संस्थेची मदत व्हावी.

सध्या आमच्याकडे दोन व्हॅल्युएटर, तीन वकील, व दोन सराफ व्हॅल्युएशनच्या कामासाठी आहेत. व्हॅल्युएटरना आमची सूचना अशी आहे की त्यांनी आम्हाला सरकारी दरानेच व्हॅल्युएशन करून द्यावे. ठेवी स्विकारताना सुध्दा आम्ही खूप मोठया रकमेच्या ठेवी स्विकारत नाही. आमचे ठेवीदार हे छोटया छोटया ठेवी ठेवणारेच आहेत. म्हणून ठेव परतीला आम्हाला कधीही अडचण आली नाही. एका कर्मचा-यापासून झालेली सुरवात आता **20** कर्म चा-यापर्यंत गेलेली आहे. आपले पिग्मी एजंटही २० पर्यंत आहेत.

गेल्या २५ वर्षात ३ संस्थेचा एवढा डोलारा उभा राहिला आहे. एका खोलीतून संस्था आता स्वतःच्या मलकीच्या तीन मजली इमारतीमध्ये स्थलांतर करणार आहे.

छोटे मोठे पुरस्कार मिळवत पतसंस्थेने २०१५ साली नागरी पतसंस्थांसाठी एकमेव असलेला ‘ **सहकार भूषण** ’ पुरस्कार मिळवला आहे आणि आता संस्था सर्व प्रकारच्या संस्थासाठी असलेला एकमेव पुरस्कार मिळवण्याच्या तयारीत आहे.

अशा रीतीने एका छोटया अळीचे आकाशात उडणा-या फुलपाखरात रूपांतर झालेले आहे. संस्था स्थापन करताना संचालकांचे प्रथम पासूनचे ध्येय होते ते संस्था आदर्शच असली पाहिजे. त्याप्रमाणे संस्थेचे कामकाज हे बॅंकेच्या नियमानुसार ठरवले गेले होते. काही नियम संस्थेला लागू नसले तरी बॅंकेच्या नियमानुसारच कामकाज होत होते. सर्व रेशो लागत नसले तरी काढले जात होते त्यामुळे संस्था पहिल्यापासून नफ्यामध्ये राहिली आहे. २००५ साली सर्व पतसंस्था अडचणीत आल्या होत्या काही संस्था बुडाल्या पण दत्त नागरीच्या ठेव वाढीवर त्याचा काही परिणाम झाला नाही.

मनात योजना खूप आहेत व त्या आमलात आणण्याचा प्रयत्नही चालू आहे. आता
पर्यंत संस्था आदर्श कशी राहिल याकडेच लक्ष दिले गेले परंतू इथून पुढे संस्थेची संख्यात्मक व गुणात्मक वाढ कशी होईल या कडे लक्ष दिले जाईल

पहिली गोष्ट म्हणजे सध्या संस्थेच्या दोन शाखा आहेत. त्यात वाढ करण्याचा विचार आहे. ठेवी वाढवण्याच्या दृष्टीने व कर्ज वाटपासाठी हे अपुरे पडत आहे. तेंव्हा शाखा वाढविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने कोणत्या गावात शाखा काढाव्यात याचा विचार चालू आहे.

संस्थेमध्ये इतर कर्जाबरोबर सोने तारणही केले जाते म्हणून मोठया कर्जासाठी एकाऐवजी दोन सराफांच्या विचार घेतला जातो. पिग्मी एजंटाच्या सहकार्यामुळे नोटाबंदीच्या काळात संस्थेला ग्राहकांना मदत करण्यात कोणतीही अडचण आली नाही. संस्थेमध्ये पिग्मी चालू आहे. पिग्मी एजंटना काम करणे सोईचे जावे व त्यांचा वेळ वाचावा यासाठी पिग्मी मशीन घेऊन दिलेली आहेत. पिग्मी एजंट संस्थेचा प्रत्यक्ष भाग व्हावेत यासाठी व त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने प्राव्हिडंट फंड चालू करता येईल का हा विचार चालू आहे.

संस्थेच्या सभासदांसाठी संस्थेला कोणकोणत्या गोष्टी करता येतील याचा विचार तर कायमच मनात असतो. संस्थेचा सभासद हा संस्थेचा मालक आहे. त्याचा विश्वास कायम ठेवण्यासाठी व सभासद समाधानी राहण्यासाठी ज्या गोष्टी करणे शक्य आहे त्या करण्यासाठीच्या योजना कायम चालू असतात. जेष्ठ नागरीकांना व ठेवीसाठी व्याजदर जास्त दिला जातो. एखादा सभासद जर संस्थेमध्ये येवू शकत नसेल तर त्या सभासदाला कोणतीही सेवा घरपोच दिली जाते.

कर्जामध्येसुध्दा व्यावसायिक महिलांना कमी व्याजदरात कर्जे दिली जातात. बचत गटासाठी सुध्दा संस्था गेली काही वर्षे काम करत आहे व ते काम वाढवण्यासाठी काही योजना आखण्यात येत आहेत. महिलांना काही व्यवसाय शिकवून त्यासाठी कर्ज पुरवठा करण्याची विचार आहे.

संस्थेच्या कर्मचा-यांना जास्तीत जास्त संरक्षण मिळावे म्हणून संस्थेने प्राव्हिडंट फंड चालू केला आहे. सेवानियम पूस्तिका आहेच परंतू विमा योजनाही चालू करण्यासाचा विचार आहे. कर्मचारी समाधानी असावा, त्यांच्या भविष्याची तरतूद असावी यासाठी काही योजना विचाराधीन आहेत.

संस्थेच्या मुख्य कार्यालय व दोन्ही शाखामध्ये संगणकीकरण झालेले आहे व त्यांच्या एकत्रीकरणासाठी आता स्वतःचे डाटा सेंटर उभारण्याची योजना आहे.

संस्थेने स्वतःची जागा घेतलेली आहे. त्यावर एक मोठी इमारत बांधण्याचे काम चालू होणार आहे. भविष्यात कर्मचा-यांना व ग्राहकांना सोईचे व्हावे या दृष्टीने इमारतीचा आराखडा तयार करण्याचे काम चालू आहे. इमारत पार्किंगसह सर्व सोईनीयुक्त व कधीही कमी पडणार नाही याप्रकारे बांधली जाणार आहे. इमारतीमध्ये लॉकर सिस्टीमही चालू करण्याचा विचार आहे.

पतसंस्थांना सभासदासाठी A.T.M ची सोय करता येते तेंव्हा तोही विचार आहे. सध्या संस्थेत वीज बीले भरण्याची सोय केलेली आहे. N.E.F.T व R.T.G.S या सोयीपण आहेतच. कॅशलेस व्यवहाराबद्दल सर्वत्र जागृती चालू आहे. तरी आपल्या पतसंस्थेत कॅशलेस व्यवहार कसे करता येतील याबाबत तज्ञांच्याकडून मार्गदर्शन घेणे चालू आहे.

संस्थेच्या सुवर्णमहोत्सवाच्या वाटचालीकडे जात असता एकदम भरारी न मारता संस्था पायरीपायरीने यशाच्या शिखराकडे जाणर आहे. त्यासाठी आमचा प्रयत्न राहिल.
जे जे काही संस्थेच्या दृष्टीने आवश्यक असेल उपयुक्त असेल ते ते सर्व संस्था स्विकारणार आहे. संस्था आदर्श आहेच पण हाच आदर्श कायम राहील यासाठी छोटया छोटया गोष्टी सुध्दा आदर्शच असल्या पाहिजेत असा आमचा आग्रह राहिल.

संस्थेचा पाया त्यावेळच्या संचालकांनी पक्का घातला आहे. त्यावरची इमारत आताच्या संचालकांनी मजबूत व उत्तुंग करावयाची आहे. संस्थेचा आदर्श टिकवून ठेवण्यासाठी जे जे नवे बदल येतील ते स्विकारून आम्ही पुढे जाणार आहोत. सुवर्णमहोत्सव पाहण्यासाठी

कदाचित आम्ही नसू पण आम्ही तयार केलेली संस्था ज्या डौलाने रौप्यमहोत्सव साजरा करत आहे त्या आगळयावेगळया वैशिष्टयपूर्ण रितीने साजरा करेल ही खात्री आहे.

भारतीय अर्थशास्त्रामध्ये घडणा-या घडामोडी पहाता त्यात फार मोठे बदल घडत आहेत. त्यामुळे सुवर्णमहोत्सवाच्या वेळी संस्थेचे काय स्वरूप असेल हे सांगता येत नाही परंतू जे कोणते स्वरूप असेल त्यात आमची दत्त नागरी आदर्श व अग्रगण्य असेल अशी ग्वाही मी आत्ताच देते.

आमच्या दत्त नागरी प्रमाणेच आमची रौप्यमहोत्सवानिमित्य काढलेली स्मरणिकालाही वैशिष्टयपूर्ण आहे. कारण स्मरणिकेचे संपादन प्रसिध्द साहित्यीक व समीक्षक वैजनाथ महाजन यानी केलेले आहे. त्यामुळे स्वतःच्या विषयात तज्ञ असलेल्या लोकांचे अनुभवातून लिहीलेले लेख स्मरणिकेमध्ये आलेले आहेत. हे लेख वैचारिक असून सध्याच्या तसेच पूढील काळातील संस्थांना व लोकांनाही मार्गदर्शक ठरणारे आहेत. उदा. लेखापरिक्षकांनी लेखापरिक्षणावर लिहीलेला लेख सर्वच पतसंस्थांना मार्गदर्शक ठरणार आहे. संस्थेवर भरभरून प्रेम करणा-या लोकांनी संस्थेला प्रेमाने जाहिराती दिल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानलेच पाहिजेत. आमच्या संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्य सर्वथरातील लोकांनी शुभसंदेश पाठविले आहेत. शुभेच्या दिलेल्या आहेत त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कामच आहे. आमच्या संस्थेतील सर्व संचालक, कर्मचारी व पिग्मी एजंट यांनी हा रौप्यमहोत्सव सोहळा सुफळ संपूर्ण केला त्याबद्दल त्यांना शतशः धन्यवाद.

स्पर्धेच्या युगातही आमची दत्त नागरी पाय रोवून समर्थपणे उभी आहे व सतत प्रगतीपथावर आहे. संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी शुभेच्छा देवून मी आपला निरोप घेते.

जय महाराष्ट्र, जय सहकार.

चेअरमन

सुनिता गजानन कुलकर्णी